**नियमीत दिवाणी दावा नं. १९५/२०१७ मधील नि.३३ खालील आदेश**
**CNR : MHSN06001885-2019**
**(रसुल करिम मुश्रीफ वि. नासीर इलाही मुतवल्ली आणि इतर)**

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी विरुध्द कायम ताकीदीकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी प्रतिवादी नं. ०६ व ०७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे. प्रतिवादी नं. ०६ शौकत महिबूब मुतवल्ली हे दि. ०६.०९.२०२० रोजी व प्रतिवादी नं. ०७ हे दि. १५.०८.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर प्रतिवादी नं. ०६ हे कोव्हीड-१९ मध्ये बंद असलेल्या कालावधी मध्ये मयत झाले आहेत. कोव्हीड-१९ मुळे बंदी असल्यामुळे कोठेही जाता येत नसल्यामुळे मृत्यु दाखला व त्यांच्या वारसांची नांवे घेऊन, मुदतीत वारस अभिलेखावर आणता आले नसल्यामुळे वारस अभिलेखावर घेणेस विलंब झालेला आहे. म्हणून वादी यांनी वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, सदरचा अर्ज मान्य व कबुल नाही. सदरचे प्रतिवादी नं. ०६ हे दि. ०६.०९.२०२० रोजी मयत झालेले आहेत, तरी सदरचा अर्ज हा ९० दिवसाच्या आत मुदतीत दिलेला नाही. तसेच झालेल्या उशीराचे योग्य कारण नमुद केलेले नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रतिवादी नं. ०६ हे दि. ०६.०९.२०२० रोजी व प्रतिवादी नं. ०७ हे दि. १५.०८.२०२१ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी नं. ०६ व ०७ यांच्या वारसांना सदरचा दावा चालविण्याचे व त्यांचे म्हणणे लक्षात घेण्याची संधी देणे तसेच त्यांच्या वारसांना आवश्यक ते पक्षकार म्हणून दाव्याकामी सामील करणे न्यायोचीत वाटत आहे. मयत वादीचे वारस हे सदर कामी आवश्यक पार्टी असल्याचे दिसून येत असल्यामुळे दाव्याचे स्वरुप नैसर्गिक न्यायतत्व

लक्षात घेता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. वादी यांनी अर्जात नमुद केलेले कारण हे पुरेशे व योग्य असल्याचे दिसून येत आहे. सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे, म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१.** वादी यांचा अर्ज मंजुर.

**०२.** वादी यांनी मयत प्रतिवादी नं. ०६ व ०७ यांचे वारस अभिलेखावर आणावे. त्या अनुषंगाने दाव्यामध्ये आज पासून १४ दिवसाच्या आत नि. क्र. १ वर दुरुस्ती करावी.

सही/-
(श्रीमती एम. एस. मनगुळी)
दि.११.०१.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of the Stenographer : S.P. Patil
Court : II[nd] Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj.
Date of Decision : 11/01/2022
Judgment/Order signed by
the Presiding Officer on : 13/01/2022
Judgment/Order uploaded on : 13/01/2022